# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नांदेड |
| 2 | पोलीस स्टेशन | पो.स्टे विमानतळ जि.नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | गु.र.नं. २५६/२०२६ कलम ७ भ्र.प्र.अ. १९८८ अन्वये |
| 4 | तक्रारदार | पुरुष, वय ३८ वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | राजेश गोविंदराव पडलवार, वय ५१ वर्षे, पद मुख्याध्यापक, नेमणूक हुतात्मा माधव विद्यालय मुखेड, तालुका मुखेड जिल्हा नांदेड, राहणार शारदानगर, नांदेड ( वर्ग ब) |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक ०३/०६/२०२६ चे १८.४१ ते २१.०० वाजताचे दरम्याण प्लॉट क्र.४०१, गजानन अपार्टमेंन्ट, शारदा नगर नांदेड. |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक ०४/०६/२०२६ चे ०४.११ वाजता |
| 8 | मागणी केलेली रक्कम | ६०,०००/— रुपये |
| 9 | स्विकारलेली रक्कम | ५०,०००/— रुपये |
| 10 | **थोडक्यात माहिती –**<br>दिनांक ०३/०६/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, ते हुतात्मा माधव विद्यालय मुखेड येथे लिपिक पदावर कार्यरत आहेत. त्यांना आरोपी लोकसेवक मुख्याध्यापक यांनी विद्यालयाचे शालेय खर्चाच्या नावाने प्रती महिना १२०००/— रुपये हप्ता म्हणून माहे जानेवारी—२०२६ ते मे—२०२६ असे एकूण पाच महिन्याचे हप्ते तसेच तक्रारदार यांच्या बदली करिता व त्यांना नोटीस न देण्यासाठी ६०,०००/— रुपये लाचेची मागणी केली आहे, अशा मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी दिली.<br>दिनांक ०३/०६/२०२६ रोजी तक्रारदार यांना शासकीय पंचासह आरोपी लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांनी लोकसेवक मुख्याध्यापक यांना कॉल केला असता त्यांनी त्यांचे शारदा नगर नांदेड येथील घरी बोलावून घेतले. आरोपी लोकसेवक मुख्याध्यापक पडलवार यांनी तक्रारदार यांना विद्यालयाचे शालेय खर्चाचा हप्ता या नावाने बदली करिता व नोटीस न देण्यासाठी शासकीय पंचा समक्ष ६०,०००/— रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५०,०००/— रुपये स्वीकारण्याचे मान्य केले व आता यापुढे तुला हप्ता देण्याची गरज नाही यातच तुझी बदली करून घेतो असे सांगितले.<br>दिनांक ०३/०६/२०२६ रोजी तक्रारदार यांना शासकीय पंचासह लोकसेवक मुख्याध्यापक पडलवार यांचे राहते घरी शारदानगर नांदेड येथे पाठविले असता लोकसेवक मुख्याध्यापक पडलवार यांनी शासकीय पंचा समक्ष तक्रारदार यांचे कडून विद्यालयाचे शालेय खर्चाचा हप्ता या नावाने तक्रारदार यांचे बदली करिता व त्यांना नोटीस न देण्यासाठी ५०,०००/— रुपये लाच स्वीकारताना रंगेहात मिळून आले आहेत. आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून पोस्टे विमानतळ नांदेड येथे गुरनं २५६/२०२६ कलम ७ भ्र.प्र.अ. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. | |

सदरची सापळा कारवाई मा. श्री.श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेड चे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार, पोलीस निरीक्षक श्रीमती माधुरी यावलीकर व नांदेड युनिट पथक यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

**१) श्री. श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक** – ०२४६२ – २५५८११, मो.नं. ९८२३४१०५०६
**२) श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक** – मो.नं. ९३५९०५६८४०.
**३) टोल फ्रि** – १०६४
**४) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी क्रमांक** – ०२४६२ – २५३५१२
**५) Website** – **www.acbmaharashtra.gov.in**
**६) Mobile App** – **www.acbmaharashtra.net**
**७) Facebook Page** – **www.facebook.com/maharashtraACB**
**८) Twitter** – **@ACBnanded**
**९) Instagram** – **acb_nanded**
**१०) Youtube Cahnnel** – **@AntiCorruptionBureauNanded**
**११) whats App number** – **८९५६५०१०६४**

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड